भाग १०

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : १०

डॉ. सुहास पेठे
एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** चिंतनक्षण : भाग-१० ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

अनुग्रह होणे हा पूर्वपुण्याईचा पुरावा, कृपेचा संकेत, समाधानसाधनेचा जबाबदार शुभारंभ व जीवनाच्या चिंतामुक्त वाटचालीचा दुर्लभ शुभशकुन आहे.२७१

आधी आचरून मग सांगणारे
'दुर्लभ' आणि अशांनी
सांगितलेले आचरणारे
त्याहून 'दुर्लभ'!२७२

गुरूंचा काय, देवाचा काय बाहेर
फोटो केवढाही लावला, तरी
आत फोटो केवढा उमटला आहे,
ते खरे महत्त्वाचे ![२७३]

अक्षरशः अगणित व्यक्तींचे अंतर्जीवन
सात्त्विक, विधायक घडवणे ही संतांची
कोणताही गाजावाजा न करता,
निरपेक्षपणे, अविरत चाललेली,
विलक्षण समाजसेवा आहे.[२७४]

मोकळे राहाण्यास
धैर्य लागते. २७५

भेद दिसणे ही वस्तुस्थिती
असली, तरी अभेद जाणणे
व जमणे हे कर्तृत्व आहे.२७६

आपल्यावर आधीच असलेल्या कृपेची जाणीव जागृत ठेवणे आणि पुढे होऊ शकणाऱ्या कृपेसाठी अनुकूल घडत राहाणे, हा खऱ्या शिष्याचा गरजेचा दैनंदिन गृहपाठ आहे.[२७७]

लहान ‘मोठे’ होतात तेव्हा कौतुक आहे, पण मोठे ‘लहान’ होतात, तेव्हा खेद आहे.२७८

काही जिवंत मूर्ती दगडासारख्या वागतात हा अनुभव असेल, तर काही दगडी मूर्ती जिवंत असल्यासारख्या वागतात, हाही भक्तांचा अनुभवच आहे, हे कळू शकेल.[२७९]

जगात चांगल्यावाईटाचा सीसॉ कुठल्याच बाजूला न टेकता सुरू राहाणार आहे, आपल्याला मात्र चांगल्या बाजूला बसून मुक्त व्हायचे स्वातंत्र्य आहे.२८०

‘तुझे ईश्वराशिवाय चालू शकेल’ याची खात्री माणसात उत्पन्न करणे, हा ईश्वरनिर्मित मायेचा महापराक्रम आहे !२८१

संगणकांच्या अचूकतेचे व कार्यक्षमतेचे कौतुक करताना दुसऱ्याला समजून घेण्याची, सांभाळून नेण्याची व प्रतिभेची माणसात व देवात असलेली क्षमता त्यांच्यात नाही, हे विसरू नये.२८२

निर्गुण पेलत नाही व सगुण
भाबडेपणा वाटतो, या पेचात
आपण बहुमोल देवाला गमावतो,
याचे भान अनेक सुशिक्षित
म्हणवणाऱ्यांनाही नसते.२८३

नदी आडवी आली तर पूल टाकील,
समुद्र आड आला तर जहाज
बांधील, पण प्रपंच नामाच्या आड
आला तर मात्र माणूस 'योग नाही'
म्हणेल ! २८४

मूर्तिपूजा हवी, कारण प्रतिक्रिया न देणारा दगडातला देव पाहायची क्षमता आली, तर पुढे प्रतिक्रिया देणारा माणसातला देव पाहाता व पचवता येईल !२८५

सृष्टीपेक्षा स्वतःला स्वतंत्र, वेगळे व श्रेष्ठ मानणे हे मानवी अज्ञान आहे ! २८६

लोभ म्हणजे गरजांच्या पूर्तीचे स्टेशन गाठल्यावरही पुढे पळत राहून अपघात करणारी गाडी होय.[२८७]

भगवंताच्या भांडवलावर व
निरपेक्ष कर्तव्यांच्या उलाढालींवर
चालला तरच प्रपंचाचा धंदा
समाधानाचा नफा देऊन
जातो.२८८

उपासना म्हणजे नुसती
सात्त्विक कष्टांची
रास रचणे नव्हे.२८९

आपण खरे तर सद्‌गुरुलीलेच्या प्रकाशात जगत असतो, हे ज्यांच्या लवकरच लक्षात येते, ते भाग्यवंत होत.२९०

ज्यांच्या विवेकपूर्ण निर्णय व कृतींत त्यांचे मन अकारण लुडबूड करीत नाही, तेच स्वत:चा व जगाचा उद्धार करू शकतील.२९१

मुक्तीसाठी दगडही धडपडत आहे,
म्हणून मुक्ती हे दगडासारख्या
माणसाचेही काम आहे व
दगडापेक्षा श्रेष्ठ माणसाचेही !२९२

आपली परिस्थिती आजच्या अपेक्षांशी जुळत नाही म्हणून माणसाची तक्रार असते, पण ती त्याच्या कालच्या कर्मांशी जुळते, हे लक्षात आले तर तक्रार कमी होईल.[२९३]

उत्तम स्वास्थ्यासाठी 'आधी देऊन मग उरलेले खावे', पण किमान स्वास्थ्यासाठी 'खाऊन उरलेले तरी निदान द्यावे !' २९४

संस्कारकेंद्रे व वृद्धाश्रम ही आता
अपरिहार्य झाली असली, तरी आपल्या
उत्तम प्राचीन कौटुंबिक
संस्कारसंस्कृतीची ती जिवंत स्मारके
आहेत, हे न विसरणे बरे होईल.२९५

खऱ्या 'गुरुत्वा'स फक्त 'गुरुत्व'च असावे लागते. ते नसलेल्यांना मग वय, वक्तृत्व, सिद्धी, अभिनय, कला - असे काही मदतीस घ्यावे लागते. २९६

स्वधर्म जगणाऱ्याला जगवणे ही भगवंताची जबाबदारी आहे व तो ती पुरी करतोच.[२९७]

निवृत्तीनंतर ज्ञानेश्वरी वाचू
म्हणणे म्हणजे जगून झाल्यावर
कसे जगायचे ते शिकू
म्हणण्यासारखे आहे.२९८

खऱ्या अनुग्रहानंतरचे साधन
सहज व आनंदमय असते,
आधीच उचललेल्या ओझ्याच्या
पाटीला हात लावावा तसे !२९९

आपल्या प्रपंचाची गाडी त्याच्या
खऱ्या मालकाच्या दारात लावून
रोज शांतपणे आपण नामाच्या
घरी मुक्कामास जावे.३००

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *